# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ६५ वा ❑ मंगळवार दि.१५ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## आधुनिक सामाजिक न्यायाचे प्रणेते

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

डॉ.बाबासाहेब भीमराव आंबेडकर हे आधुनिक भारतातील सामाजिक न्यायाचे प्रणेते आहेत. समाजातील दलित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. दलितांच्या उत्थानासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी असे निरीक्षण नोंदवले की धार्मिक ग्रंथांद्वारे समाजातील दलितांवर विविध प्रकारचे अपंगत्व लादले गेले आहे. त्यांनी त्याला विरोध केला. त्यांनी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना करून अस्पृश्यता चळवळ सुरू केली. मार्च १९२७ मध्ये, ते त्यांच्या ५००० समर्थकांसह महाड गावातील चवदार तलावावर पोहोचले आणि उच्च जातींची मक्तेदारी मोडून काढत तलावाचे पाणी प्यायले. १९३० मध्ये त्यांनी मंदिरांवरील उच्च जातींच्या मक्तेदारीला आव्हान दिले आणि अस्पृश्यांच्या प्रवेशाच्या अधिकारासाठी चळवळ सुरू केली आणि त्यात ते यशस्वी झाले. लंडनमध्ये झालेल्या गोलमेज परिषदेत त्यांनी भाग घेतला आणि दलितांसाठी स्वतंत्र निवडणुकांची मागणी केली परंतु गांधीजींच्या विरोधामुळे आणि उपोषणामुळे त्यांना पुणे करारावर स्वाक्षरी करावी लागली आणि दलितांसाठी स्वतंत्र निवडणुकांचा अधिकार सोडून द्यावा लागला. व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे कामगार सदस्य (१९४१-४६) म्हणून त्यांनी दलित आणि कामगारांच्या हितासाठी अनेक कायदे केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे, रेल्वे, कस्टम, टेलिग्राफ इत्यादी भारत सरकारच्या खात्यांमध्ये ८.३३ टक्के नोकऱ्या दलितांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला आणि ते देशाचे पहिले कायदा मंत्री बनले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी देशाच्या संसदेने संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी एक मसुदा समिती स्थापन केली, ज्याचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते. संविधानाद्वारे त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि महिलांसह सर्व नागरिकांना मूलभूत अधिकार प्रदान केले. राज्याला कल्याणकारी राज्य बनवण्याचा प्रयत्न केला. दलित आणि जमातींना लोकसभा, विधानसभा आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यात आले. ऑक्टोबर १९५६ मध्ये त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे निधन झाले. डॉ. आंबेडकर यांना १९९० मध्ये देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न प्रदान करण्यात आला.

**डॉ. भीमराव आंबेडकरांच्या जीवनाचे उद्दिष्ट**

दलित आणि समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देणे हे होते. त्याच वेळी, अशी सामाजिक व्यवस्था विकसित करायची होती ज्यामध्ये कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होणार नाही. त्यांनी आयुष्यभर भारतातील दलित वर्गाच्या उत्थानासाठी काम केले, ज्याच्या आधारावर त्यांना भारताचे लिंकन आणि मार्टिन लूथर म्हटले जाते. डॉ. आंबेडकरांवर बुद्ध, कबीर आणि ज्योतिबा फुले यांचा प्रभाव होता. बुद्धांनी देव आणि आत्म्याचे अस्तित्व स्वीकारले नाही. त्यांनी स्वातंत्र्य, समता, प्रेम आणि बंधुता यावर आधारित अशा सामाजिक व्यवस्थेची कल्पना केली, ज्यामध्ये राजा आणि सेवक, पुरुष आणि स्त्री, ब्राह्मण आणि शूद्र हे सर्व समान असतील. संत कबीर हे धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या ढोंगीपणा, अंधश्रद्धा आणि कट्टरतावादाचे कट्टर विरोधक होते. त्यांनी वर्ण आणि जातीवर आधारित सामाजिक व्यवस्थेला विरोध केला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्यायासाठीचा संघर्ष पुढील तीन भागात अभ्यासता येईल- १. सामाजिक न्यायाची संकल्पना २. सामाजिक अन्यायाचे मुख्य स्रोत आणि कारणे ३. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठीचा संघर्ष.या सर्व तरतुदी त्यांनी संविधानात केलेल्या आहेत.

## वाचनसंस्कृतीला नवा श्वास : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महापारेषण परिमंडळात वाचनालयाचे उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** महापारेषण छत्रपती संभाजीनगर परिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती यंदा आगळ्या-वेगळ्या आणि प्रेरणादायी पद्धतीने साजरी करण्यात आली. मुख्य अभियंता नसीर कादरी यांच्या संकल्पनेने आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली व विशेष मार्गदर्शनाखाली परिमंडळाच्या प्रशासकीय इमारतीत वाचनालयाचे उद्घाटन आज उत्साहात पार पडले.

या वाचनालयासाठी महापारेषण कार्यालयात तांत्रिक, कायदेविषयक, मानवी संसाधन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि अन्य महापुरुषांवरील चरित्रात्मक पुस्तकांची खरेदी करण्यात आली आहे. तसेच विद्युत क्षेत्रातील सर्व परिपत्रके उपलब्ध करून देण्यात आली आहेत ‘‘ज्यांनी पुस्तकासाठी घर उभारले त्या



महामानवाच्या जयंतीनिमित्त वाचनालय सुरू करून त्यांच्या विचारांना नसीर कादरी यांनी कृतीरूप दिले,‘‘ असे गौरवोद्गार उपस्थितांनी व्यक्त केले.

या प्रसंगी मुख्य अभियंता नसीर कादरी साहेबांनी स्वतः तांत्रिक विषयांवरील २५ पुस्तकांचे दान करून एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. त्यांच्या प्रेरणेतून अधीक्षक अभियंता रंगनाथ चव्हाण आणि अतिरिक्त कार्यकारी अभियंता रवींद्र गवई यांनी प्रत्येकी पाच पुस्तके दान केली. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या महामानवाच्या जयंतीनिमित्त ‘‘किमान दोन पुस्तके दान‘‘ ही प्रतिज्ञा घेत वाचनालय वृद्धिंगत करण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमात अधीक्षक अभियंता संजीवकुमार सुरडकर यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनातून आजच्या तरुणांनी प्रेरणा घेण्याबाबत लेख वाचून मार्गदर्शन केले. अधीक्षक अभियंता रंगनाथ चव्हाण यांनी बाबासाहेबांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे महत्त्व विशद केले. कार्यकारी अभियंता सौ. मनीषा भंगाळे मॅडम यांनी संविधानावरील कार्यशाळेचा प्रस्ताव मांडला आणि कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी संविधानावरील सत्र घेण्याबाबत सहमती दर्शवली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. मंजुषा दुसाने मॅडम, अधीक्षक अभियंता संजीव कांबळे, संजय आव्हाड, अमित वाघमारे यांच्यासह परिमंडळातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आभार प्रदर्शन करताना श्रीमती सीमा गाडेकर मॅडम यांनी सर्वांना आवाहन केले की प्रत्येकाने किमान दोन पुस्तके दान करून वाचनालयाच्या ज्ञानवृक्षाला बहर द्यावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशी लावलेले हे वाचनाचे रोपटे, उद्या नक्कीच वटवृक्ष होईल, असा दृढ विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

## २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचा समारोप

### बंधुत्वाची भावना समाजातील चांगुलपणा वृद्धिंगत करते - कृष्णकुमार गोयल

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** समाजात चांगल्या माणसांची संख्या कमी होत चालली आहे, गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याने समाजमन दूषित होतेय, याचा आपण अनेकदा खेद व्यक्त करतो. पण अशा आव्हानात्मक व निराशेच्या परिस्थितीत बंधुत्वाची भावना समाजात चांगुलपणा वृद्धिंगत करते. माणूस जोडण्याचे काम बंधुता चळवळीतून होत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ उद्योजक कृष्णकुमार गोयल यांनी केले.

विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या समारोपावेळी कृष्णकुमार गोयल बोलत होते. ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुभाष वारे यांच्या अध्यक्षतेखाली नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात झालेल्या संमेलनात विश्वबंधुता साहित्य परिषदेचे अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे, कार्याध्यक्ष डॉ. विजय ताम्हाणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकांत वानखेडे, कादंबरीकार शंकर आथरे, वरिष्ठ पत्रकार सचिन कापसे आदी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे, विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या सदस्या डॉ. तेजश्री पारंगे यांना विश्वबंधुता दर्पण पुरस्कार प्रदान करण्यात




आला. सविता मेनकुदळे यांनी पुरस्कार स्वीकारला. अनिल गव्हाणे (बीड), गोरख पालवे (नाशिक), पुष्पा दलाल (अमरावती), अनुराधा वायकोस (परभणी), संध्या भोळे (भुसावळ), कांचन गवळी (टिटवाळा), दीपाली भोसले (पुणे), सागर काकडे (सातारा), अमीर पटेल (सांगोला), स्वाती ठुबे (अहिल्यानगर), गौसपाक मुलानी (सांगोला) व विठ्ठल संधान (नाशिक) यांना विश्वबंधुता शब्दक्रांती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा. सुभाष वारे म्हणाले, मानवी उत्क्रांतीच्या प्रवासात मन आणि शरीराच्या अफाट क्षमता नीटपणे वापरल्या गेल्या नाहीत. सहकार्य आणि सकारात्मकतेचा भावनेतून त्याचा समाजहित, देशहितासाठी चांगला उपयोग व्हायला हवा. त्यासाठी जात, धर्म, वर्ण, आर्थिक भेद, द्वेषभावना बाजूला ठेवून बंधूतेच्या विचारांची गुंफण करायला हवी. महापुरुषांनी दिलेल्या विचारांची बेरीज आणि संविधानाची सांगड घालून येणाऱ्या आव्हानांचा सामना एकोप्याने करण्याची गरज आहे.

बंधुताचार्य प्रकाश रोकडे म्हणाले, बंधुतेचा विचार घेऊन चालणारे सर्वजण तथागत भगवान बुद्धांचा वारसा पुढे नेत आहेत. संतांनी दिलेली शिकवण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान आणि मानवतेचा, बंधुतेचा विचार देशाला एकसंध ठेवण्यासाठी पूरक आहे. ही चळवळ अधिक व्यापक व्हावी, यासाठी युवा पिढीने यात सहभागी व्हावे. समाजातील द्वेष, मत्सर दूर करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे.

## ग्रंथमहोत्सव’चे रुपांतर आनंदसोहळयात व्हावे-पालकमंत्री शिरसाट

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** पुस्तक वाचनाचा फायदा माणसाला जीवनभरात नक्की होत असतो. समाजमन घडविण्या-या ग्रंथाच्या या महोत्सवाचे रुपांतर आनंद सोहळयात व्हावे, असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केले.


डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ७ ते १४ एप्रिल दरम्यान भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठात पहिल्यांदाच ११ ते १४ एप्रिल दरम्यान इतिहास वस्तू संग्रहालयाच्या हिरवळीवर उभारलेल्या भव्य मंडपात ग्रंथ महोत्सव घेण्यात येत आहे. या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्र्याच्या हस्ते शुक्रवारी (दि.११) करण्यात आले. कुलगुरु डॉ.विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्र-कुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ.भारत खंदारे, डॉ.योगिता पाटिल, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ.वैशाली खापर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नंदकुमार घोडेले, राजेंद्र जंजाळ, अशोक पटवर्धन यांची ही मंचावर उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगीश्री.शिरसाट म्हणाले, विद्यापीठात पहिल्यांदाच मोठया प्रमाणावर ग्रंथ महोत्सव होत आहे. आजकाल वाचन संस्कृती लोप पावत असून या प्रदर्शनात आलेल्या प्रत्येकाने किमान एक पुस्तक विकत घेऊन वाचन करावे.

महोत्सवात देशभरातून २० नामांकित प्रकाशक सहभागी झाल्याचे प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे यांनी प्रास्ताविकात सांगितले. प्रा.प्रराग हासे यांनी सूत्रसंचालन तर कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी, रोजदांरी कर्मचारी, विद्यार्थी व वाचक मोठया संख्येने उपस्थित होते.

इतिहास वस्तू संग्रहालयच्या हिरवळीवर १४ एप्रिलपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या दरम्यान ग्रंथ प्रदर्शन व विक्री सुरु राहणार आहे.

विद्यापीठात आल्याचा मला मनस्वी आनंद असून वसतीगृहासाठी २५ कोटींचा निधी सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येईल, असे आश्वासन श्री.शिरसाट यांनी दिले. विद्यापीठास आवश्यक ते सहकार्य राज्य शासनाकडून करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

## लक्षवेधी छायाचित्र....




सुंदर निसर्ग छायाचित्र

(छाया : संजय दारमवार, मुंबई)

## डॉ. श्रीकांत टकले यांच्या कडून संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी देणगी

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी शास्त्रज्ञ डॉ. श्रीकांत टकले यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन मिळावे यासाठी अकरा हजार रुपये माजी विद्यार्थी संघाला देणगी दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांच्याकडे डॉ. श्रीकांत टकले यांनी अकरा हजार रुपयांचा धनादेश सुपूर्त केला.

या प्रसंगी डॉ. श्रीकांत टकले म्हणाले, अण्णासाहेब मगर महाविद्यालयामुळे मी संशोधनात करिअर करू शकलो. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी मी ही देणगी देत आहे. या रकमेतून २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात सर्वोत्कृष्ट संशोधनपर शोधनिबंध



लिहिणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकाला बक्षीस स्वरुपात देण्यात यावेत. येथील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करण्यास मी तयार आहे.

महाविद्यालय आणि रिसर्च इंडस्ट्री एकत्र येऊन संशोधनात्मक काम केल्यास इथल्या विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितच फायदा होईल.

महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी महाविद्यालाचे माजी विद्यार्थी संशोधक म्हणून मोठे होतात तेव्हा त्याचा महाविद्यालयास अभिमान वाटतो. असे माजी विद्यार्थी आजी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असतात. त्यांनी आजी विद्यार्थांमध्ये संशोधक निर्माण व्हावेत यासाठी मदत करणे ही आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे. आविष्कार सारख्या संशोधन स्पर्धांमधून नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्प सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या फंडाचा उपयोग केला जाईल असे सांगितले.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शुभांगी औटी, आयक्यूएसी चेअरमन डॉ. लतेश निकम, माजी विद्यार्थी समिती प्रमुख डॉ. गंगाधर सातव, डॉ. अशोक ससाणे, डॉ. उज्वला खिस्ती, डॉ. बी. एम. शिंदे, डॉ. किरण रणदिवे, डॉ. नाना झगडे, प्रा. शैला धोत्रे, प्रा. अपूर्वा बनकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लतेश निकम यांनी केले तर आभार डॉ. गंगाधर सातव यांनी मानले.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com




## अंतरात्म्याला ओळखता येणे आवश्यक


**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या अंतरंगात डोकावणे, हे कदाचित प्रयास देणारी प्रक्रिया वाटेल, परंतू तो जीवनाचा प्रवास समजून करत राहण्याची आवश्यकता आहे. आपल्या अंतरात्म्याची ओळख त्या माध्यमातून होणे शक्य होऊ शकते. त्याला निश्चितच योगाभ्यासाची जोड द्यावी लागेल. जेणेकरून आपला अंतरात्म्याचा शोधा अधिक सुकर होऊ शकतो आणि आत्मनिर्भर होण्यासाठी तो अत्यंत जरुरीचा देखील असतो. ह्या विषयाकडे आपणा योगाभ्यासातून अध्यात्माचा विचार करण्याची आवश्यकता असते. ह्या अध्यात्माचा संबंध कोणत्याही धार्मिक दृष्टीकोनातून न जोडता त्याच्याकडे आपण योगशास्त्र ह्याच दृष्टीकोनातून बघितले पाहिजे.

आपण आत्मनिर्भर होण्यामुळे आपला आत्मविश्वास वाढीस लागतो, आपण स्वावलंबी बनत जातो, आपण सर्वसामान्य न राहता सर्वार्थाने समृद्ध होत राहतो, स्वतःचा आधार आपण स्वतःच होत राहतो, प्रत्येक गोष्टीत सहभागी होऊन त्यामध्ये स्वतःला समाविष्ट करण्याचे आपण धैर्य निर्माण करत राहतो. आपले अंतर्मनच आपले मार्गदर्शक असते, तेच आपल्याला आत्मनिर्भर बनवू शकते. त्यासाठी सर्वप्रथम आत्मनिष्ठ होणे जरुरीचे असते. आपल्या आत्मनिष्ठतेमुळे आपल्यात नवचैतन्य, नवी उमेद, नवा उत्साह आणि नवा जोश निर्माण होत असतो. आत्मविश्वास वाढीस लागण्याची सुरुवात ह्याच प्रकारे होत राहते. ह्यासाठी आपण आपल्या अंतर्मनाला सक्षम करण्याची, त्याची कार्यक्षमता वाढवण्याची जरुरी असते. आपले अंतर्मनच आपला गुरु आणि मार्गदर्शक म्हणून कार्यरत होत राहते. गुरु आणि गुरुतत्व ह्याबद्दलची ओळख मूळ तत्वापासून केलीजाते.त्यात गुरु आणि गुरुतत्व यातील फरक तसेच तत्व म्हणजे काय ह्याचे महत्वही समजून घेतले पाहिजे. सध्याचे मानवी जीवन असे विस्कळीत झाले आहे, हे शास्त्रीय मीमांसेतून स्पष्ट होत असतेच, परंतू त्याच्याकडे अनकेदा दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

## आनंदाची गुढी

**ज्योतिर्मय साहित्य**




शालिवाहन राजांची गोष्ट तर प्रसिद्धच आहे. शालिवाहनांच्या राज्यात अपार समृद्धी होती. पण त्यामुळे प्रजेत आळस आणि सैन्यामध्ये उत्साह आणि चपळता राहिलेली नव्हती. कुठलीही गोष्ट एकाच ठिकाणी वापर न होता पडून राहिली की ती गंजते किंवा बिनकामाची ठरते. तसेच शालिवाहनाच्या सैन्याचे झाले होते. शत्रूच्या आक्रमणाला तोंड देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात राहिले नव्हते. अशातच शकांचे आक्रमण राज्यावर झाले. मग काय करायचे ? सैन्याला प्रशिक्षण द्यायचे किंवा नवे सैनिक भरती करायचे तर काही वेळ जाणारच. मग शालिवाहनांनी हजारो मातीचे सैनिक, हत्ती, घोडे तयार केले. त्याच्या साहाय्याने त्यांनी जुलमी अशा शकांचा पराभव केला. मग तो विजय लोकांनी गुढया तोरणे उभारून साजरा केला. तेव्हापासून शालिवाहन शक सुरु झाला. पण खरंच मातीचे सैनिक, हत्ती, घोडे लढले असतील का ? मला वाटतं त्याचा प्रतीकात्मक अर्थ आपण घ्यायला हवा. शालिवाहन राजाचे सैन्य मृत्तिकेसमान म्हणजे चैतन्यहीन, निरुत्साही झाले होते. त्यांच्यात मरगळ आली होती. मातीच्या सैन्यात प्राण फुंकणे म्हणजे त्यांच्यातील चैतन्याला आवाहन करणे, त्यांच्यातील स्वत्व, स्वाभिमान, शौर्य, देशाभिमान जागृत करणे. किती सुंदर अर्थ आहे हा !




जेव्हा जेव्हा समाजात अशी स्वत्वहीनता, मरगळ आणि गुलामगिरीची वृत्ती अंगवळणी पडते, तेव्हा तेव्हा त्या समाजात असेच प्राण फुंकावे लागतात. वर्षानुवर्षे गुलामी रक्तात भिनलेल्या समाजात असे चैतन्य समर्थ रामदास स्वामी, तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केले म्हणूनच शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्मितीची गुढी उभारता आली. स्वातंत्र्यपूर्व काळात असे चैतन्य लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पं नेहरू, लाल बहादूर शास्त्री, सरदार पटेल, डॉ आंबेडकर, स्वा सावरकर यांच्यासारख्या नेत्यांच्या आणि क्रांतिकारकांच्या तेजस्वी त्यागातून निर्माण झाले आणि स्वातंत्र्याची गुढी उभारली गेली.

गुढी ही उंच उभारली जाते. ती आशाअपेक्षांचे प्रतीक असते. ती जणू आपल्याला सांगते, तुमचे ध्येय, आशा, अपेक्षा अशाच उंच असू द्या. त्यांना मर्यादा घालू नका. स्काय इज द लिमिट ! आपल्या नवीन वर्षाचा आरंभ या सणाने होतो म्हणून वर्षारंभीचे उत्तम, उदात्त असे संकल्प मनाशी योजा आणि वर्षभरात आपल्या प्रयत्नांनी ते तडीस न्या. हाच गुढीपाडव्याचा संदेश आहे. कवयित्री बहिणाबाई फार सुंदर संदेश आपल्याला आपल्या कवितेतून देतात. त्या म्हणतात –

गुढीपाडव्याचा सन, आता उभारा रे गुढी
नव्या वरसाचं देनं, सोडा मनातली अढी
गेली साली गेली आढी, आता पाडवा
पाडवा
तुम्ही येरयेरांवरी लोभ वाढवा वाढवा.

या बहिणाबाईच्या सांगण्याप्रमाणे मनातली अढी सोडून देऊन एकमेकांवरचे प्रेम वाढवू या. आनंदाची गुढी उभारू या.






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा

**ज्योतिर्मय साहित्य**

विषय शब्दाचा अर्थ पाहू गेल्यास''विशेषेण सिंचन्ति इंद्रियाणि मनश्च'' ज्याच्या ठिकाणी इंद्रिये व मन बुडून जातात मग्न होतात म्हणजे इंद्रीयभोग अर्थात देहातून सुख घेण्याची आवड. कधीही समाधान न होणाऱ्या आशेच्या साखळीने माणुस बांधलेला असतो. भगवंताचा विसर पडणे म्हणजे वाईट काळ समजावा. आत्मबुध्दी विसरून देहबुद्धी त जाण म्हणजे स्वर्गातुन नरकात पडण्या सारखे आहे. समर्थांनी दहाव्या ओवी पासुन अठराव्या ओवी पर्यतचा प्रवास म्हणजे शरिराच्या जन्माची क्रीया ते समजून घेत असताना आपल्याला आपल्याच शरीराची किळस येते. शरीर वरवर कितीही चांगले वाटलेतरी त्यात डोकावून पहाता ते किती घाणीचै साम्राज्य आहे. हे वरील ओव्या वाचताना खात्री पटते. घाणीने भरलेले हे शरीर कितीही निर्मळ करायचा प्रयत्न केला तरी ते स्वच्छ होत नाही. समर्थीनी डोकं या अवयवाला मात्र ऊत्तमांग म्हणलं आहे. मल मुत्र ओक हे जर शरिराचे झाले नाही तर मनुष्य लवकरच मरेल. **क्रमश:**

अठ्ठावीस ओव्याच्या पुढे तर आईच्या गर्भात जीवाचे कसे हाल होतात याचे वर्मन केले आहे. आईच्या गर्भात असताना मुल सोह,सोहम् असं म्हणते मी तो आहे मी ईश्वर आहे. आणि बाहेर पडल्यावर ते ''कोहं कोहं '' म्हणू लागते.जीवाला देहबुद्धी येते. व स्वस्वरूपाची जाणीव मावळू ० या लागते. देह विकार विकसीत होऊ लागला की सुखदुःखाचे हेलकावे बसु लागतात. यातुन सुटण्याचा ऐकचं मार्ग तो म्हणजे ''भगवंताला शरण जाणे''

सन्माननीय वाचक मंडळी तुमच्या सगळ्यांच्या प्रोत्साहननाने व समर्थाच्या आशिर्वादाने आज तिसरा दशक तुमच्या हाती देताना खुपच आनंद होत आहे गेल्या दोन महिन्यांत माझ्याच शरिराच्या काही भागाने असहकार पुकारल्यामुळे मी तुमच्या समोर व्यक्त होऊ शकले नाही. त्याबद्दल क्षमस्व

## सत्संगतीचे दोन प्रकार



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. संतांची संगत दोन प्रकारे होऊ शकते. एक, संतांच्या देहाची; दुसरी, संतांनी सांगितलेले साधन करीत राहण्याची. यांपैकी पहिली, म्हणजे संताच्या देहाची संगती लाभणे फार कठीण आणि दुर्मिळ. कारण संत जरी खरा असला तरी त्याला ओळखणे कठीण असते, आणि पुष्कळदा त्याच्या बाह्य वागणुकीवरून मनात विकल्प येण्याचा संभव असतो; आणि एखाद्या भोंदूशीच गाठ पडली तर त्याच्या संगतीपासून नुकसान हे ठरलेलेच. म्हणून पहिला, म्हणजे संताच्या देहाच्या संगतीचा मार्ग, हा पुष्कळदा धोक्याचा ठरण्याचा संभव असतो. दुसऱ्या मार्गाने जाण्यात, म्हणजे त्याने सांगितलेले साधन करण्यात, बिलकूल धोका नसतो; कारण खरा संत काय किंवा भोंदू साधू काय, कोणीही झाला तरी तो दुसऱ्याला सांगताना खरे आणि बरोबर असेल तेच सांगेल. तो भोंदू असला तरी, आपला भोंदूपणा लपविण्याकरिता, जे बरोबर असेल तेच सांगणे त्याला जरूर असते. साधकाने शुद्ध भावनेने ते साधन केले की सत्संगतीचा फायदा मिळून त्याचे काम होते. खऱ्या संताच्या देहाच्या संगतीचा लाभ जर दैववशात् प्राप्त झाला तर मात्र काम बेमालूम होते. ज्या वाहनाचा आपण आश्रय करतो त्या वाहनाचा वेग हा आपला वेग होतो; फक्त त्या वाहनात निश्चल बसून राहणे एवढेच आपले काम असते. तसे आपण खऱ्या संताजवळ नुसते पडून राहावे. संताच्या संगतीत आपली कृती अशी काहीच नसते, नुसते अस्तित्व असते. त्यामुळे अहंकाराला वाव न राहून वासनेचा क्षय व्हायला फार मदत होते. तुकाराम महाराजांनी देवाजवळ धनसंपदा मागितली नाही, मुक्तीदेखील नको असे म्हटले, फक्त संतसंगती दे असे म्हटले.

संतसंगाने नाम घेण्याची बुद्धी येते. बुद्धीची स्थिरता ठेवणे हे फक्त नामानेच साधेल. नाम जरूर तेवढे ठेवते आणि बाकीचे नष्ट करून टाकते. पण अनन्यभावाने नाम घ्यावे. नाम घेता घेता बुद्धीला स्थिरता येते; आणि मग मनात विकल्प न येता संतांच्या देहाच्या संगतीचा खरा फायदा घेता येतो. सत्संगतीत कष्टाशिवाय ईश्वरप्राप्ती होते. संतसंगतीत साधने आपोआप होत असतात. त्यांच्या पूजनाबरोबर पूजन, भजनाबरोबर भजन, श्रवणाबरोबर श्रवण, स्मरणाबरोबर स्मरण आपोआप होते. सत्संगतीत स्वत:ची विस्मृती होते आणि नामस्मरण घडते. म्हणून प्रयत्नाने संतसंगती करावी. तिथे प्रारब्ध आणू नये. सत्संगतीत राहून नाम घेतले तर देहबुद्धीच्या कोंडीतून बाहेर पडता येते.

संतांना जे आवडते ते आपल्याला आवडणे म्हणजे त्यांचा समागम करणे होय.

## संस्कृती व संस्कार





विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## रघुनायका, मागणे हेचिं आता

**ज्योतिर्मय साहित्य**

मंदिराची पायरी उतरून ताई भयंकर चिडीने, त्राग्याने मुख्य दरवाजापाशी आल्या. स्वत:शीच पण मोठ्याने बडबडत होत्या. स्वत:शीच बडबडण्याच्या नादात शेजारी एक मोरपीस विकणारा दादा दिसला त्याच्याशी बोलू लागल्या :

''पुन्हा इथे दर्शनाला यायचं नाही. इतक्या लांबून माणसं येतात पण देवाला धड पाहूही देत नाहीत हे लोक. लांब रांगेतून देवासमोर पोचलो नाही तोच पुढे ढकलतात. ह्याह.''

तो दादा : ''पहिल्यांदा येताय का?''

ताई : ''नाही हो. नेहमी हे असंच असतं.''

तो : ''अहो ताई, इथे असंच होतं याची कल्पना होती तरी आलात ना? मग आता जाऊ द्या की. नावं का ठेवताहात?

ताई : ''अहो दादा, आशा वाटतेच नं की जरा नीट दर्शन होईल म्हणून? देवापुढे मागणे मागता येईल, तोपर्यंत देवासमोर उभे राहता येईल. मागच्या दर्शनानंतर मुलाला चांगला जॉब लागला. आता जावयाच्या घराचा व्यवहार पक्का होऊ घातला आहे, त्यामुळे देवाचे दर्शन घेऊन येऊ म्हणून आले. पण इथे साधे दहा सेकंदही देवासमोर नीट उभे राहता येत नाही. आजही जेमतेम पाहिले देवाला.''

तो : ''रांगेत किती वेळ गेला हो?''

ताई : ''तब्बल पाऊण तास होते रांगेत. तरी बरे पुढच्या एक ताई छान गप्पा मारत होत्या म्हणून बरे झाले.''

तो : ''हा. हे बरे. एकट्या असता तर उगीच नामस्मरण वगैरे करत रांगेत उभे राहावे लागले असते.''

ताई (त्याच्या बोलण्याचा अर्थ न कळून) : ''म्हणजे?''

तो (विषय टाळत) : ''म्हणजे काही नाही हो. पाऊण तास नामस्मरण करायचे आणि प्रत्यक्ष देवासमोर दहा सेकंदही उभे राहता आले नाही तर सामान्य माणसाला राग येणारंच ना. साहजिकच आहे.''

ताई (एक भुवई वर करत) : ''सामान्य माणूस म्हणजे?''

तो (विषय टाळत) : ''काही नाही हो. जनरल बोललो.''

ताई : ''नाही. सांग नीट.''

मनातली चीड जराशी व्यक्त झाली असल्याने एव्हाना ताई किंचित शांत होत होत्या.

तो : ''ताई, समजा एक दिवस असे झाले की सबंध गाभारा...गाभाराच कशाला?...सबंध देऊळच लोकांसाठी बंद ठेवून फक्त तुम्हालाच आत प्रवेश दिला तर? अख्खाच्या अख्खा दिवस देव फक्त तुमच्यासाठी. मोबाईल फक्त बाहेर ठेवायचा. तो सोबत न्यायचा नाही. बाकी सगळे देऊळ तुम्हाला. तर काय कराल?''

ताई (तोंडाचा आ वासून, विचारांत गर्क) : ....

तो : ''आहेत की अशीही पुरातन देवळे अजून, जिथे माणसे फार नसतातंच. आणि ते राहू द्या बाजूला. पण समजा खरेच असे झाले तर?''

ताई विचारातच पडल्या होत्या.

तो : ''सांगा.''

ताई : ''अहो, थांबा हो. विचार करत्ये.''

तो : ''जास्त ताण देऊ नका. मी सांगतो काय कराल ते. फक्त माझे म्हणणे बरोबर की चूक ते सांगा.'' ''तुम्हाला देवाचे शांततेत दर्शन हवे आहे, देवाशी संवाद हवा आहे, त्याला मनातल्या अनेक गोष्टी सांगायच्या आहेत, यासाठी सबंध देऊळ फक्त तुम्हाला देऊ केले...संपूर्ण देवळात फक्त देव आणि तुम्ही...तर तुम्ही आत जाल...नमस्कार कराल, देवाकडे मागण्या मागाल... हे असले सगळे कराल....आणि मग पाच मिनिटांत पहिला प्रश्न मनात येईल... 'आता काय करायचे दिवसभर? मोबाईल पण नाही सोबत. स्तोत्रे-बित्रे किती म्हणणार...जप तरी किती करणार...इतर वेळेस सगळे सांभाळून आपण तोंडी लावल्यासारखे देवाचे करतो ते वेगळे...पण अख्खा दिवस देवळात करायचे तरी काय? आणि देवाशी आपण बोलून बोलणार तरी किती?...तो तर काहीच बोलत नाही. बापरे.'...होईल ना असे?'' **(क्रमश)**

## नीतिशतक निरूपण



अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**मृगमीनसज्जनानां तृणजलसन्तोषविहितवृत्तीनाम।**
**लुब्धकधीवरपिशुना निष्कारणवैरिणो जगति ।।**

अर्थ – या सृष्टीत गवतावर आपले उदरनिर्वहन करणा-या हरिणासोबत व्याधाचे, पाण्यावर आपले उदरभरण करणा-या मास्यांचे धीवरासोबत तसेच समाधानाने जीवन जगणा-या सज्जनांसोबत दुर्जनाचे वैर हे अकारण असते.

या विश्वात काही वैरभाव हे नैसर्गिक किंवा स्वाभाविक आहेत. अशा प्रकारच्या वैरभावांमध्ये सज्जन आणि दुर्जन यांच्या वैराचा समावेश आहे. असा आशय या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी व्यक्त केला आहे.




**ज्योतिर्मय साहित्य**

सीता म्हणाली खरे सांगू तुम्हाला, त्यांनी स्मित केले, त्यांना प्रभुंनी हवे नको हे विचारले यामुळे त्या सुखावून गेल्या.'' माझी फार इच्छा होते आहे की मी तपोवनात जावे. तेथे विसावा घ्यावा, तिथे तप करावे.एक रात्र का होईना तेथे रहावे असे वाटते.''

असे डोहाळे का लागले ? तर सीता मातेचे हरन झाल्यानंतर, श्री राम यांना वनातअनेक ऋषींची भेट झाली होती. असाच सत्संगाचा लाभ आपणासही व्हावा हे डोहाळे मातेस लागले होते.

श्री राम सितेसाठी दोन वेळेस रडले.

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

पहिल्यांदा जेव्हा तिचे अपहरण झाले तेंव्हा. ते झाडांना बिलगले, त्यांनी नदी तीरावर विरह केला. वृक्ष वेलींना माझी सिता कोठे आहे हे सांगा म्हणून अक्रोश केला. ते डोंगरावर खूप रडले. तिथे पार्वतीने त्यांची परीक्षा सुद्धा घेतली. पार्वतीने शंकरास विचारले, आपण कोणाचे ध्यान करता?. त्यांनी रामाकडे अंगुली निर्देश केला.

पार्वती म्हणे तो तर सामान्य माणसा सारखा रडतोय.तुम्ही त्यांचे ध्यान का करता ? शंकर म्हणाले अगं ते प्रत्यक्ष परब्रम्ह आहे.पार्वतीचा यावर विश्वास बसेना,हा सामान्य माणसा सारखा विलाप करणारा व्यक्ती आणि परमात्मा कसा असेल ? ती म्हणाली मी यांची परीक्षा घेते. शंकर नको म्हणाले, तरी ती ऐकेना. तिने सितेचे रूप घेतले व ती रामा समोर उभी राहिली. कितीही तिने रामा समोर समोर करुनही राम पार्वतीकडे पाहत नाहीत. लक्ष्मण देखील पार्वतीच्या या रुपात फसले, पण राम नाही. पार्वती म्हणे अहो मीच सीता. तेंव्हा राम म्हणे तू का आई येथे ? माते मी तुला ओळखले.तेंव्हा पार्वती म्हणे, मग तुम्ही सामान्य पुरुषा सारखे का झाडाना मिठी मारता,रडता? श्री राम म्हणाले ,मी ज्या ज्या झाडांना,वेलींना आलिंगन देतो,ज्यांना ज्यांना विचारतो सीता कोठे आहे ? ते प्रत्यक्ष तप करीत असलेले ऋषी आहेत .त्यांना त्यांच्या तपाचे फळ देत आहे.




## पक्षाघात आजार माहिती

**ज्योतिर्मय साहित्य**

पक्षाघाताची लक्षणे

मेंदूचा रक्त पुरवठा बंद झाल्यामुळे किंवा मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाल्यामुळे मेंदूला योग्यरित्या रक्तपुरवठा होत नाही. त्यामुळे मेंदूच्या कार्यावर विपरीत परिणाम होऊन खालील पक्षाघाताची लक्षणे दिसून येतात.

एका बाजूच्या हाता-पायाची ताकद कमी होते.

हातापायात लुळेपणा जाणवतो, मुंग्या येतात.

तोंड वाकडं होते, बोलण्यास त्रास होतो.

अन्न गिळण्यास आणि श्वास घेण्यास त्रास होतो.

एका डोळ्याने अंधुक दिसू लागणे.

चक्कर येणे, तोल जाणे,

चेतना कमी होणे

तीव्र डोकेदूखी

ही लक्षणे पक्षाघातात असतात. अशी लक्षणे जाणवल्यास त्वरीत वैद्यकीय उपचार होणे आवश्यक असते.

लक्षात ठेवा ''

पक्षाघाताची लक्षणे ओळखण्यासाठी '' लक्षात ठेवा..

रुग्णास हसण्यास सांगा. हसताना एका बाजूचा चेहरा, ओठ आणि डोळे लटकलेले दिसल्यास ते पक्षाघाताचे लक्षण असते.

रुग्णाला त्याचे दोन्ही हात पुढे व वर उचलण्यास सांगा. जर रुग्णाचा एक हात वर व समोर उचलता येत नसल्यास ते पक्षाघाताचे लक्षण असते. रुग्णास प्रश्न विचारून तो व्यवस्थित बोलतो का ते पहा. जर त्याला बोलताना त्रास होत असल्यास ते पक्षाघाताचे लक्षण असते.

कोणतीही कृती करताना किंवा प्रतिक्रिया देताना सामान्य प्रतिक्रिया न आढळता त्यामध्ये विसंगती आढळते


संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९


वरील लक्षणे रुग्णामध्ये जास्त प्रमाणात दिसून आल्यास वेळ न दवडता रुग्णाला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी घेऊन जावे. जवळ वाहतुकीचे साधन नसल्यास १०८ या नंबरवर फोन करून रुग्णवाहिका बोलावून घ्या. पक्षाघाताचा झटका आल्यानंतरची पहिले ३ तास हे असतात ह्या काळामध्ये रुग्णावर उपचार केल्यास रुग्ण लवकरात लवकर बरा होतो तसेच पक्षाघाताच्या झटक्यामुळे मेंदूमध्ये होणारा बिघाड थांबवता येऊ शकतो. रुग्णास वेळीच उपचार मिळाल्यास पुढील मोठा धोका टळू शकतो.

वरील लक्षणे जर कमी प्रमाणात जाणवत असतील तर निगेटीव्ह आयनची टोपी मिळते ती वापरण्यास सुरुवात करावी व मेंदूचे रक्ताभिसरण सुरळीत होण्यासाठी हर्बल ट्रीटमेंट घेणे उत्तम ज्यायोगे मेंदूचे रक्ताभिसरण सुरळीत होऊ शकेल व संभाव्य धोका टळू शकेल.

****

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

एका छोट्याशा खेड्यात वाढलेल्या आणि सामान्य कुटुंबातील मृणालचं लग्न एका मोठ्या जमीनदाराच्या मुलाशी होतं. या जमीनदार कुटुंबातील मोठी सून म्हणजे मृणालची मोठी जाऊ रूपाने अगदीच सामान्य आहे. तिच्या रूपाची उणीव भरून काढण्यासाठी मृणालला सून म्हणून करून आणलं जातं. या जमीनदारांच्या घरात स्त्रियांना फारशी किंमत नसते. मृणालच्या सौंदर्याचं चार दिवस कौतुक होतं पण एक स्त्री म्हणून तिला नंतर अपमानास्पद वागणूक दिली जाते. एक दिवस तिच्या मोठ्या जाऊबाईची आई वारते आणि जावेची लहान बहीण बिंदू त्यांच्याकडे राहायला येते. बिंदुला तिच्या घरी तिचे चुलत भाऊ त्रास देतात म्हणून ती आपल्या या मोठ्या बहिणीकडे येते. पण तिच्या अशा येण्याने घरातल्या सर्वांनाच जणू मोठं संकट पडतं आणि कुठून आली ही बया म्हणून कपाळावर आठ्या पडतात. बिंदू दिसायला कुरूप असते. तिचाही घरात छळ सुरु होते. तिला मोलकरणीपेक्षाही खालच्या दर्जाची वागणूक दिली जाते. अशा वेळी तिच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते ती मृणाल. ती मृणालला आपल्या खोलीत आश्रय देते. मृणालही तिच्यावर प्रेम करते. एक दिवस बिंदूचे लग्न एका ठार वेड्या माणसाशी लावून दिले जाते. मृणाल आपले काही दागिने तिच्या अंगावर घालून तिला रवाना करते. पण तिची सासू महाभयंकर असते. बिंदू सासरच्या छळामुळे पळून येते. मग बिंदू आपल्या चुलतभावाकडे आश्रयासाठी जाते. पण तो तिची रवानगी पुन्हा सासरी करतो. बिचाऱ्या बिंदूचा काहीही दोष नसताना हे जग तिचं वैरी बनलेलं असतं. बिंदूपुढे एकच पर्याय असतो. ती मरणाला जवळ करते. आता मृणालला सुद्धा सासरी राहायचं नसतं. तिला मुक्त व्हायचं असतं. सासरच्या वातावरणात तिची घुसमट होते, श्वास कोंडतो. ती घर सोडून बाहेर पडते. कायमची, परत न येण्यासाठी आणि नवऱ्याला पत्र लिहिते. खरंतर तिला आपल्या सोबत बिंदूला घेऊन जायचं असतं आणि त्या कष्टदायक संसारातून तिची मुक्तता करायची असते परंतु त्यापूर्वीच बिंदूने आपल्या जीवनाचा शेवट करून घेतलेला असतो. मृणाल एका तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येते.

# आणि मी कवयित्री झाले...

ज्योतिर्मय साहित्य

"मी कविता लिहिणारी झाले, हे स्वतःलाही कळलं नाही..." कधी कधी आपणच स्वतःला नव्याने शोधतो, आणि त्या शोधात स्वतःचीच एक अनोखी ओळख आपल्या समोर उभी राहते. आपण क्षणभर थबकतो. विश्वास बसत नाही की हेही आपणच आहोत ?

कालच्या त्या प्रकाशन सोहळ्यात जेव्हा आयोजकांनी "कवयित्री नीता चापले" असा उल्लेख केला, तेव्हा मी क्षणभर स्तब्ध झाले. मी कवयित्री ? आत्तापर्यंत मी स्वतःला राष्ट्रीय क्रिकेटपटू, मार्गदर्शक, पावरलिफ्टर आणि स्विमर म्हणूनच ओळखत आले. या ओळखी माझ्या अस्तित्वाचा भाग झाल्या आहेत. पण "कवयित्री" ही ओळख माझ्यासाठी नवीन होतीएखाद्या नव्याने उमलणाऱ्या कळीप्रमाणे, हळूहळू खुलणारी, गंध दरवळवत जाणारी.

माझ्या लेखनाचा प्रवासही सहज नव्हतातो रक्ताच्या शाईने लिहिल्यासारखा होता. मैदानावरचं घामगाळलेलं जगणं, अपयशातून उभं राहणं, हार स्विकारून पुन्हा नव्यानं झुंजणंया सगळ्यांची रग माझ्या प्रत्येक शब्दात उतरली आहे. पण स्टेजवर उभं राहून स्वतःची कविता सादर करणं हा एक वेगळाच अनुभव होता. नवा, थोडा धसका देणारा, पण अंतःकरणाला भिडणारा.

मी आधीच मनाशी ठरवलं होतंमी कोणत्याही भूमिकेतून पळ काढणार नाही. मग ती मैदानावरची असो वा व्यासपीठावरील. आयोजकांनाही मी स्पष्ट सांगितलं होतं"माझी मानसिक तयारी असेल, तरच मी कविता सादर करेन. अन्यथा नाही." माझा



सच्चेपणा आणि प्रामाणिकपणा, ही माझी खरी ओळख आहे. आणि तीच मला कुठल्याही परिस्थितीत झुकू देत नाही.

**नीता चापले**
राष्ट्रीय क्रिकेटपटू मार्गदर्शक राष्ट्रीय पावरलिफ्टर स्विमर लेखिका

जेव्हा व्यासपीठावर उभं राहून मी म्हणाले, "सन्माननीय व्यासपीठ, उपस्थित मंडळी आणि मैत्रिणींनो, मी एक राष्ट्रीय क्रिकेटपटू, मार्गदर्शक आणि पावरलिफ्टर आहे" तेव्हा क्षणभर सगळेच चकित झाले. त्यांच्या चेहऱ्यावर एकच प्रश्न उमटलेलाही इथे काय करते? मस्त खेळावं, वजन उचलावं.

कार्यक्रम संपल्यानंतर एका श्रोत्याने जवळ येऊन सांगितलं, "मॅडम, आयोजकांनी तुमचं वेगळं व्यक्तिमत्त्व आधी सांगायला हवं होतं. तुम्ही बोललात म्हणून समजलं, नाहीतर आम्हाला कळलंच नसतं की नीता चापले म्हणजे कोण." मी हसून उत्तर दिलं"वेळेचं नियोजन असतं, प्रत्येक कवयित्रीचं स्थान महत्त्वाचं असतं."

माझ्या कवितेची शैलीही अशीच आहेस्वतंत्र, बिनधास्त, स्वतःची वाट चोखाळणारी. मी सादर केलेली कविता होती"मी वेडी आहे!" कारण वेडं असणं म्हणजे स्वतःला पूर्णत्वाने जगणं. आणि खरं तर, वेडेच लोक इतिहास घडवतात हे मी वाचलं होतं, पण आता त्याचा अनुभव घेत होते.

समीक्षकांनी मला बंडखोर कवयित्री असं संबोधलं. "नीता चापले म्हणजे हातात तुतारी घेऊन आलेली कवयित्री!" हा उल्लेख माझ्यासाठी गौरवाचा क्षण होता. त्या समीक्षणाने माझ्या लेखनाला एक वेगळी उंची दिली.

चैत्र महिन्याच्या अष्टमीचा दिवस. हा सोहळा माझ्यासाठी खूप काही घेऊन आला. कार्यक्रम संपल्यावर काही लेखिकांनी मला थांबवून सांगितलं "तू खरी दुर्गा आहेआज नवदुर्गा आम्हाला भेटली." त्या शब्दांनी माझ्या अंतरात्म्याला गवसणी घातली. हातात ट्रॉफी आणि सन्मानचिन्ह घेऊन स्टेजवरून उतरताना माझे डोळे भरून आले.

सगळ्यात जास्त आठवण आली ती बाबांची. आजोबा पैलवान होते, पण बाबांनी मला शिस्त, सातत्य आणि एकाग्रतेचं बाळकडू दिलं. ते नेहमी म्हणायचे"आपलं काम भलं, आपण भले." कधीच कुणाच्या मागे लागायचं नाही, फक्त स्वतःच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करायचं. आज ते नाहीत, पण त्यांच्या आठवणी, त्यांच्या सवयींचे ठसे, त्यांच्या शिकवणीचे संस्कार आजही माझ्या प्रत्येक कृतीत सामावले आहेत.

माझं लिखाण सुरू झालं ते एका आंतरिक वेदनेतून. माझ्या मुलीच्या आठवणींनी मन भरून आलं, आणि त्या भावना शब्दांत उतरू लागल्या. तिचं अपूर्ण स्वप्न तिची कलेची आवड, तिचं हसणं, तिचा आत्मा या सगळ्याला जपण्यासाठी लेखणी हातात घेतली. पण अशा आठवणींवर काहीतरी साकार करणं जितकं प्रेरणादायक, तितकंच आतून काळवंडून टाकणारं असतं.

आज मी कविता लिहिते, वाचते, सादर करते पण अजूनही प्रत्येक ओळीत तिची सावली असते. तिचं अस्तित्व, माझ्या अस्तित्वाला अर्थ देतं.

माझ्या कवितेचा अंश

"मी वेडी आहे"
मी वेडी आहे, होय, मी वेडी आहे,
शब्दांसोबत झुंजणारी, डोळ्यांतून पाझरणारी.
मी खेळाच्या मैदानावरही वेडीच होते,
स्वतःशी स्पर्धा करणारी, थकवा न ओळखणारी.
आता लेखणी हातात घेतली आहे,
कारण भावना आता शब्द मागतात
मी वेडी आहे आणि वेडं असणं मला आवडतं.
कारण वेडेच लोक इतिहास लिहितात.

# हिंदु नव वर्ष स्वागत समिती तर्फे आयोजित भजन स्पर्धेत स्वरवेलु संगीत विद्यालयातील महिला संघ प्रथम

ज्योतिर्मय साहित्य
छत्रपती संभाजीनगर

– दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हिंदू नववर्ष स्वागत समिती तर्फे आयोजित करण्यात आलेल्या भव्य भजन स्पर्धेचा काल रविवार, दि १३ एप्रिल रोजी राम मंदिर किराडपूरा, छ. संभाजीनगर येथे जाहिर करण्यात आला. यंदा स्वरवेलू संगीत विद्यालयातील महिला संघाने प्रथम क्रमांक पटकावला. पंचविस वर्ष पूर्ण होत असताना या स्पर्धेत, या वर्षी संपूर्ण जिल्ह्यातून एकूण ४० भजनी मंडळांनी आपलं बहारदार सादरीकरण केले. पाच हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरुप होते.

स्पर्धेत स्वरवेलू संगीत विद्यालय भजनी मंडळ यांचे विशेष सादरीकरण झाले "ध्यान लागले रामाचे " हे भजन तर "पाई पैंजन " ही पारंपारीक गौळण संघाने सादर केली. बासरी वादनाने संपूर्ण सभागृह भक्तिमय झाले होते. टाळ मृदंग, चिपळ्यांच्या सुमधूर आवाजात संपुर्ण वातावरण भक्तीने निनादुन गेले होते.



पूजा काळे (भालेराव) यांच्या मार्गदर्शनाने हे सादरीकरण करण्यात आले होते, संघात सौ मंगल काळे, सौ सुरेखा सावजी, सौ नेत्रा कुलकर्णी, सौ कल्पना सबनीस, सौ सीमा धर्माधिकारी, सौ.अर्चना जाधव, सौ विनिता कलबुर्गे, सौ सुनीता शिरोडकर यांनी गायन केले. त्यांना निरंजन भालेराव बासरी, चिन्मय पाठक तबला, जय पांचाळ यांनी संवादिनी साथ केली.सौ अंबिका गायकवाड, सौ वंदना दौड, सौ शैलजा सुरडकर यांनी विशेष सहकार्य केले.


श्रीराम मंदिर मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी श्री दयारामजी बसैये, उदयजी कहाळेकर भक्ती मंदिर ट्रस्टचे सचिव एस एम कुलकर्णी, गजानन मंदिरचे अध्यक्ष प्रवीणजी वक्ते, त्रिदेवता मंदिराचे अध्यक्ष विश्वनाथ स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते. भजन स्पर्धेची सांगता सामुहीक पसायदानाने झाले. पसायदान म्हणतांना सगळंच वातावरण भारावून गेलं होतं. पुढच्या वर्षी च्या स्पर्धेत भेटण्याच्या आशेने सभागृहातील समस्त मंडळींनी तुर्तास निरोप घेतला.

हिंदु नव वर्षाचे स्वागत भक्तिमय व्हावे, हिंदू संस्कृतीचे जतन करण्यात यावे हा मानस आहे या स्पर्धेला २५ वर्ष झाली आणि यंदा प्रतिसाद आणि सादरीकरण हे लक्षणीय होते पुढच्या वर्षी ३ दिवसीय भजन मोहत्सव व स्पर्धेचे आयोजन करण्याचा मानस आहे –

**– श्री एस एम कुलकर्णी,**
भक्ति मंदिर ट्रस्ट सचिव

समाजात एकी राहण्यासाठी आणि संस्कृति टिकून राहण्यासाठी हिंदू नववर्ष समिति कडून निस्वार्थपणे उत्कृष्ट अशी सपर्धेची व्यवस्था करण्यात आली होती. महिलांसाठी ही विशेष स्पर्धा आयोजन केलि जाते याचे विशेष कौतुक आमच्या संघातील महिला या पन्नाशीच्या वरील आणि सेवानिवृत्त आहे. आमचा संघाने मागील २ महिन्यांपासून या स्पर्धेसाठी मेहनत घेतली आणि त्याचे यश आम्हाला भेटले. सर्व संघाचे अभिनंदन आयोजन समितीचे धन्यवाद –

**– गायिका सौ पुजा काळे भालेराव,**
स्वरवेलू संगीत विद्यालय संचालिका



## जात्यावरच्या ओव्या......

---

**नातेसंबंध : बहिण-भाऊ**

भाऊ घेतो नाटी
भावजय राग राग
नाटीला लागो आग
सुखाने नांदा दोघं ||३०||

दुबळ्या बहिणीचं
हाय वाटावर खळ,
ओलांडून गेले
भाऊ संपत्तीच्या बळ ||३१||

---

संदर्भ : कै. गवणाबाई बोराडे
संकलन : सौ मनोरमा बोराडे

# शिक्षकांसाठी प्रेरणा प्रबोधन देणारा "गारांचा पाऊस"

ज्योतिर्मय साहित्य

या पुस्तकात एकूण ३७ ललित लेख आहेत. मोठ्या व्यक्तींना त्यांच्या वागण्यातील जुलमाची जाण तर ते लेख करून देतात. बालकांच्या विकासाचा अभ्यास, संशोधन, पालकांचे उदबोधन, शिक्षकांसाठी प्रेरणा प्रबोधन असा हवाहवासा वाटणारा गारांचा हा पाऊस मनावरील मळभ काढून टाकून अतिशय लख्ख प्रकाशाचे आणि टवटवीत वातावरणाचे दर्शन घडवून आणतो. श्यामल वनारसे यांची प्रस्तावना इतकी जबरदस्त आहे की पूर्ण पुस्तकाचा सारांश, पुस्तकाचा आशय यात उमगतो.

मुलांच्या दैनंदिनीतून यात लेखिकेने त्यांचे ज्वलंत वास्तववादी अनुभव त्यांनी या लेखात सांगितले आहेत. दररोजच्या वर्तनातील अनेक बारीकसारीक बारकावे त्यांनी टिपले आहेत. त्या सर्वांना असे बारकावे टिपण्यासाठी प्रवृत्त करतात. तो सुरेख अनुभव किती जादूई ठरवू शकतो हे त्या पटवून सांगतात.

चित्रांमधून मनापर्यंत या लेखात लेखिका मुलांमनाचे दर्शन, भावविश्व हे त्यांनी काढलेल्या स्व निर्मिती चित्रात दडलेले असते असे समजावून सांगतात. मुलांचे चित्र अतिशय बोलके असतात. मुल आपल्याला दिसलेलं, जाणवलेलं, आवडणार, हवं असलेलं किंवा गंमत वाटणार किती किती या चित्रातून व्यक्त करत असतात.

एखादा विषय देऊन चित्र काढणं वेगळं आणि स्वतःच्या मनातलं काही करू पाहणं वेगळं. एकात निरीक्षण आणि दुसऱ्यात खरी निर्मिती आहेच. कला माणसाला आनंद देते, स्वतःचा शोध घेण्यास प्रवृत्त करते त्याला मोठा आणि सखोल बनवते. तंत्राला महत्व देण्यापेक्षा आतल्या गाभ्याला पोहोचायच कसं ते सांगायला हवं.

गारांचा पाऊस या लेखात डॉ.आर. डी. लैंग यांच्या या पुस्तकाची ओळख होते. त्यांनी केलेल्या भन्नाट आणि अविश्वसनीय प्रयोगाची माहिती होते. सलग सहा वर्ष मूल काय बोलतात याचे टिपण ठेवतात. आणि दररोज त्याचे लेखनही ते आवर्जून करतात. त्यांनी लेकरांचे बाल मानसशास्त्र समजून घेण्यासाठी किती सूक्ष्म आणि योग्य अभ्यास केला. मोठ्या माणसाच्या वाढीत आणि विकासात लहान मुलांचा फार मोठा वाटा असतो. या मुलांचे संभाषण त्यातील गंमत, विनोद, तर्कशास्त्र त्यातील प्रेमाची जात, रागाचा पारा, स्वत्वाची जाणीव, त्यातील भीती हे सगळच विचार करण्याजोगे आहे.



**पुस्तक परीक्षण**

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

पैशांची भाषा अनेक पालकांची विचारसरणी अशी असते की एखादी वस्तू जितकी महाग तितकी ती चांगली पण या विचारसरणीचा जास्त बारकाईने निरीक्षण केल्यावर हा प्रश्न गंभीर वाटतो. ते त्यांनी अनेक उदाहरणांनी पटवून दिले आहे. कमी किमतीच्या वस्तूही सुंदर असतात. भेटवस्तू स्वीकारताना देणाऱ्याचे मन, त्याची निवड त्याच प्रेम बघायच असत. काही माणसं अतिशय साधी कपडे घालतात. त्यामागे तत्व असतात.

कामसू आई कित्येकदा मुलांसाठी राबणाऱ्या आईला इतर काही फारसा उद्योग छंद नसतो. आवडी नसतात. मुलांना आईच प्रेम मिळालं पाहिजे हे अगदी मान्य ! पण मुलांची सगळी काम करण म्हणजे प्रेम करणं नव्हे. आपली मुलं वाढवताना किती स्वावलंबी होतायत, किती हुशारीन काम करू शकतायत, दुसऱ्याचा किती विचार करू शकतायत, दुसऱ्याला किती मदत करू शकतायत, भोवतालच्या परिस्थितीशी, माणसांशी किती जुळवून घेऊ शकतायत हे डोळे उघडे ठेऊन आई वडिलांनी पहायला हवं. आपल्या फार करण्यानं मुल दुबळे होत असेल तर आपला कामसूपणा थोडा कमी केला पाहिजे. नाहीतर तक्रारीच आसमाधानच बीज आपण आपल्या हातानी पेरून ठेवू राहत्या घरात.




मी कोण आहे? मुलाभोवतालाच वातावरण जर कायम टीकेचं असेल तर ते नाव ठेवायलाच शिकणार. घरात सारखे भांडण होत असतील तर मुलही भांडखोर बनतात. आपलं मूल धीट असावं, त्यांन विश्वासाने वावरावं असं वाटत असेल तर त्याच्याभोवती प्रोत्साहनच वातावरण हवं. तू आहेस तसा मला आवडतोस हा विश्वास त्याला मिळायला हवा. नातेवाईक आई वडील शिक्षक सगळ्याच मोठ्या माणसांनी जाणीवपूर्वक लहानशी वागावं लागत.

प्रेम होत म्हणूनच आपण जे करतो आहोत हे कशासाठी ? हे आपल्या मनात पक्क असलं आणि समंजसपणे ते मुलांना समजावून देता आलं तर अशा शंका कमी निर्माण होतील. आपली कुठलीही कृती इतरांची पर्वा, विचार न करता होता कामा नये हे मूल्य त्याच्या मनात खोलवर जाऊन बसायला हवं असतं.आपला एखादा अभिप्राय, एखादा कटाक्ष ही हे सगळं शिकवून जाऊ शकतो. मुलाच्या चुकीबद्दल चारचौघात बोलणं अगदी अभद्र आहे. पण आपण अनेकदा असे करतो. मुलाच्या चुकीबद्दल जाहीर पंचनामा न करता अस दोघांनीच बसून बोलून जो परिणाम होतो तो व्यक्तीची प्रतिष्ठा वाढवणारा असतो. आपण जे वागतो आहोत ते तस का वागतो आहोत त्याचा परिणाम काय अपेक्षित आहे आणि काय होईल याचा विचार कायम मनात हवा. आपल्याला हे सुयोग्य वागणे तेव्हाच जमेल जेव्हा आपण स्वतःशी नितांत प्रामाणिक आणि जागृत असू तेव्हाच!

माणूस आणि दगड चांगला पुरुष निर्माण करणं पालकांच्या हाती आहे याबद्दल विश्वास वाटतो.

एक साधी घटना या लेखात वस्तू विसरण्या हरवण्या मागचा तर्कशास्त्र त्या हरवू नयेत म्हणून जरूर असणारी सवय शिस्त हे खरे या घटनेतले महत्वाचे मुद्दे आहेत. ते न बोलता आपण किती निरर्थक बोलतो काय रागावतो काय मारतो काय मुलाला दोष देतो काय ! आपली भीतीच आपण त्या निमित्तानं व्यक्त करतो.

अध्यक्ष महाशय आणि माझ्या बंधू भगिनींनो मुलांची भाषण पाठ करून घेणे त्यांच्या हातवऱ्यांचे अलंकार चढवणे हा सगळा अव्यापरेशु व्यवहार असतो. वर्षातून अनेकदा वक्तृत्व स्पर्धा, वर्गातच दोन मुलांनी वर्गाला गोष्ट सांगणे, एखाद्या विषयावर काही वाचलेलं सांगण, घडलेली घटना सांगणे, एखाद्या विषयावर काही वाचलेलं सांगणे, घडलेली घटना सांगण, अमुक एका गोष्टीबद्दल मला काय वाटलं ते सांगण ही प्रथा शाळेत निर्माण केली पाहिजे, मुलांना निबंधात व्यक्त होण्याची संधी द्यायला पाहिजे. रोजच्या जगण्यात मिसळून जायला हवं. आपल्याजवळ लोकांना सांगण्यासारखे खूप काही साठले आहे का हेही पाहायला हवं. त्यासाठी वेगवेगळे अनुभव घेत राहण ते मांडताना भाषेचे प्रयोग करण भाषेचे प्रयोग करणं, भाषेचे अंतरंग समजून घेणं हे सगळ आपल्या जगण्याचा भाग बनल पाहिजे.ताण न घेता बोलता येणे जमलं पाहिजे. पुन्हा पुन्हा ते करण्याची संधी शाळेत घरात मिळाली पाहिजे.

वेगळ्या खोल्या हा लेख मला प्रचंड आवडला. मुलांना माणसाचा एकमेकांचा सहवास हवा असतो. आणि अगदी शारीरिक सहवासुद्धा. लहानपणापासून बाळाची वेगळी स्वतंत्र खोली ही कल्पना पाश्चात्य नवरा बायकोच्या गरजांना अवास्तव प्राधान्य देण्यातून निघाली असेल का? मानस एकत्रच यायला हवीत . वेगळ्या अर्थाने ही घरात भिंती नसाव्यात हेच खरं! **(क्रमश)**

# बबलू कराळे यांना राज्यस्तरीय बालरक्षक जीवन गौरव पुरस्कार

## बालरक्षक टीम महाराष्ट्र राज्य व क्रीनो एज्युकेशन सोसायटी यांचा पुढाकार

**ज्योतिर्मय साहित्य**

**अमरावती** – आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा येथील आदर्श शिक्षक बबलू विनायक कराळे यांच्या शैक्षणिक कार्याची तथा शंभर टक्के विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य तसेच गावांमध्ये व केंद्रांमध्ये एकही शाळाबाह्य विद्यार्थी न ठेवल्यामुळे त्यांच्या या शैक्षणिक कार्याची दखल घेत किनोएज्युकेशन सोसायटी व बालरक्षक टीम महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने बबलू कराळे यांना राजस्तरीय बाल रक्षक कार्य गौरव पुरस्कार २०२५ नाशिक येथे दिनांक ११/०४/२०२५ ला उद्घाटन मा. दादाजी भुसे साहेब (शालेय शिक्षण मंत्री महाराष्ट्र), मा. किशोरजी दराडे साहेब, मा. छगन भुजबळ साहेब, मा.हरिश्चंद्र राठोड साहेब (संचालक महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय सैनिक संस्था), मा.नंदकुमार साहेब (मा. शिक्षण सचिव महाराष्ट्र राज्य), मा. डॉ. शोभा पवार मॅडम (सह. संचालक महाराष्ट्र राज्य), मा. डॉ. नीलिमा टाके मॅडम (उपसंचालक अमरावती), मा. डॉ. सुचिता पाटेकर मॅडम ( शिक्षणाधिकारी माध्य. अकोला), मा अरुण जाधव ( ज्येष्ठ अधिव्याख्याता सोलापूर) यांच्या हस्ते राज्यस्तरीय बाल रक्षक जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



बबलू कराळे हे उपक्रमशील शिक्षक असून त्यांना सतत तीन वर्ष नाविन्यपूर्ण उपक्रमाकरिता डायट अमरावतीने सन्मानित केले आहे. त्यांचे शैक्षणिक तथा सामाजिक लेख नामवंत वृत्तपत्राने २०० पेक्षा अधिक प्रसिद्ध केलेले असून दै.सकाळ दै.विदर्भ मतदार, दै.हिंदुस्थान या प्रसिद्ध वृत्तपत्रांनी त्यांच्या लेखांचे सदर सुरू केले. ज्योतिर्मय साहित्य मधूनही त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल गावचे कर्तव्यनिष्ठ सरपंच मा.नारायणरावजी बोरेकार, गटशिक्षणाधिकारी राम चौधरी साहेब, केंद्रप्रमुख बोंडे साहेब, उ. श्रे.मुख्याध्यापिका कु.शीला सोळंके, आदर्श शिक्षक श्रीकृष्ण उघडे, आदर्श शिक्षिका सौ कल्पना चौधरी, आदर्श शिक्षिका कु.किरण साखरकार, बबीता पंडित मॅडम, ज्येष्ठ शिक्षक रतिराम मावस्कर सर, दिनकर राऊत सर, रश्मी पानझाडे मॅडम, यांनी राज्यस्तरीय बाल रक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल शुभेच्छा तथा अभिनंदन केले.

# आधी सिजेरियन कपिलाचं.... नंतर लग्न रायबाच...




गंगापुर जि.संभाजीनगर येथिल घटना १५ फेब्रुवरी १९९८ च्या सायंकाळी ७-३० ते ८-३० दरम्यान मी इंटेलेक्चूअल (बुध्दीवंताचा) साप्ताहीक स्वाध्याय वर्ग (प.पू.श्री.पांडूरंग शास्त्री प्रणित) साठी एड.श्री. सूगंधरावजी कानडे यांच्याकडे नेहमी प्रमाणे गेलो होतो...८-१५ वाजता माझे डोणगांव सहकारी श्री.वसंत रा. साळवे माझ्या संपर्कास आले होते.

त्यांनी लासूर स्टेशन जवळील देवळी गंगापूर पासून २२ कि.मी.या गांवी एका पशुपालकांची सं.गायीचा डिस्टोकीया साठी जावे लागणार होते. त्या प्रमाणे मी व साळवे आंदाजे १०-३० वाजता देवळी येथे गेलो होतो. गायीचे पेलवीक ब्रीम अरुंद असल्याने सिजेरियन शिवाय दुसरा पर्यायच नव्हता. ऑपरेशन साठी लागणारे प्रतीजैवके, भुलीचे इंजेक्शन व सलाईन व इतर औषधी ३ कि.मी. वरील लासूर स्टेशन वरुनखरेदी करुन देवळीला परत पशुपालकाच्या घरी परतलो. परंतू पशु पालक व त्यांचा परिवार टेम्पो घेऊन देवरंगारी येथे त्याच्या ज्येष्ठ मुलाच्या विवाहास निघण्याच्या तयारीत होते. तेंव्हा त्यांनी

तुम्ही गायीचे ऑपरेशन करा काय खर्च होईल तुम्हाला मी देईन व तुम्हालाच व्हावे लागेल गायीचे माय आणि बाप....मी त्यांना तशी सूचना दिलेली आहे....कांही वेळाने

टेम्पो वराडासह गांवाबाहेर गेला. गांवातील ३-४ व्यक्ती सहकार्य करत होते. रीतसर गायीचे सिजेरियन केले. गाय सशक्त व वेल मेंटेड असल्याने.फार त्रास झाला नाही. व सं.गायी ला हेल्दी सं.कालवड जन्मली. नंतर स्टिचेस देऊन पोस्ट ऑपरेटीव्ह इंजेक्शन दिले. या सिजेरियन ऑपरेशनची चर्चा पंचक्रोशित झाली होती !

गंगापूर परतीच्या प्रवासाला रात्रीचे ३-३० वाजले होते..... त्यावेळी दुसऱ्याच दिवसी लोकसभेचे जनरल इलेक्शन होते. त्यामुळे रात्री सुध्दा गंगापूर- लासूर स्टेशन रोडवर वर्दळ होती.

हे प्रकरण आधी ऑपरेशन गायीचे व नंतर लग्न रायबाचे या उक्ती प्रमाणे माझ्या स्मृती पटलात विसावलेले आहे ! पण गड ही जिंकला व सिंह ही चतुर्भूज झाला...! पशुपालक नंतर गंगापूरला बाजारच्या दिवसी मिठाई घेऊन आवर्जून भेटायला आला. तो प्रत्येक बाजारी गंगापूरला भाजी-पाला विक्री करण्या पुर्वी शेतातील वाणोळा मला देऊन जात असे त्यामुळे त्याच्या कृतज्ञतेचं दर्शन होत असे...

***

# नाशिकचा फुल बाजार




चुलत सासूबाईनी, आवडतात म्हणून ओंजळीत सोनचाफ्याची फुलं ठेवली. ओंजळ जवळ घेऊन भरभरून सुवास घेतला आणि त्या सुवासा बरोबरच मन केव्हा भूतकाळात जाऊन पोहचले कळलंच नाही. बहुतेक सगळ्यांचे असेच होत असावे. प्रत्येक सुवासा बरोबर काही तरी आठवण जोडलेली असते आपल्या मनात!

उन्हाळ्याच्या सुट्टीचे दिवस, तरी सकाळ इतकी प्रसन्न. रात्री अंगणात आकाशातील तारे चांदण्या बघता बघता झोप केव्हाच लागायची. आणि सकाळी चिमण्यांचे आवाज, स्वयंपाक घरातले आवाज साखर झोपेतून जागं करीत. वाड्यातल्या सगळ्या बहिणींचे मैत्रिणींचे आदल्या दिवशीच ठरलेले, उद्या लवकर उठून फुल बाजारात जायचं. त्याप्रमाणे चार आणे, आठ आणे आणि कापडी पिशवी (तेव्हा प्लास्टिक पिशव्या अस्तित्वात नव्हत्या) घेऊन मुलींचा घोळका निघायचा. रविवार कारंजा, बोहरीपट्टी ओलांडून, सरकार वाड्याच्या अवती भवती असायची ती फुलांची दुनिया. चाफ्याच्या, मोगऱ्याच्या फुलांचे ढीग चे ढीग लागलेले. छोट्या छोट्या दुकानांतून, गजरे, हार, वेण्या, बेल तुळस . अहाहा ! सगळा परिसर ओल्या हिरव्या सुगंधाने बहरलेला. अजून ही तो सगळा संमिश्र सुगंध मनात ताजा वाटतो आहे. दहा दहा पैशांचे मोगऱ्याच्या फुलांचे वाटे करून ठेवलेले. मोगऱ्याच्या सुवासा इतकंच निर्मळ हसू त्या फुलवालीच्या चेहऱ्यावर पण. इरकल लुगडं, आडवं ठसठशीत कुंकू, ओठापर्यंत नथ! या नं ताई, घ्या नं ताई ! एकेक दोन दोन वाटे ती आमच्या पिशव्यांमध्ये ओतायची. शिवाय ओंजळभर वर आणखी. आम्ही पण आपापल्या झिपऱ्या दोन वेण्या सावलीत, फुलं अलगद भरून घ्यायचो. मग इकडे तिकडे घुटमळणे व्हायचे थोडा वेळ, दुकानातल्या त्या सुंदर चाफ्याच्या वेण्या, अबोली मोगरा, विद्येची पानं आणि चकमक जीग लावून सजवलेल्या! त्या बघायला खूपच आवडायचं.

असं थोडंसं फिरून झालं की लक्षात यायचे, अगं चला गंगेवर जाऊ, पलिकडेच रामसेतू खालून वाहणारी , हो आमची गंगाच ! नाशिक चे लोक गोदावरीला गंगा म्हणणार. आईने सांगितलेली मिरची कोथंबिर, खीरा काकडी अशी काही तरी बारीक सारीक खरेदी झाली की मग पिशव्या सांभाळत सांभाळत घरी. कारण आता गजरे करायची घाई असायची. संध्याकाळी कुठे ना कुठे चैत्र गौरीचे हळदी कुंकू असायचे. मग तो वेणी पेक्षा मोठा गजरा लावून नटणे असायचे. असे ते बालपण ! किती भोळे, निरागस !

मागच्या वर्षी भाचीच्या मंगळागौरीला गेले तेव्हा फुल बाजारात गेलो. त्याच ठिकाणी तशीच ती फुलांची दुनिया ! थोडी वेगळी जाणवली खरी. प्लास्टिक चे क्रेट भरभरून गुलाबाची फुलं. मोबाईल मध्ये भराभर फोटो काढून घेतले. पण तेव्हाच्या मोगऱ्याच्या राशी, चाफ्याच्या वेण्या, आज फोटो नसताना ही मनात तितक्याच ठळक उमटलेल्या आहेत. किंबहुना जास्तच. त्याच्या ताज्या दरवळणाऱ्या सुगंधा सह !!




### राम नाम...

हनुमंतच्या ओठावरती,
राम नाम राम राम.
मारुतीच्या काळजातही,
राम नाम राम राम.
पवनसुताच्या मुखातही,
राम नाम राम राम.
अंजनी सुताच्या वाणीतही,
राम नाम राम राम.
राम नाम घेता घेता,
मिळतो मोक्ष धाम.
राम नाम घेऊन तो,
राम राम स्वर्ग धाम.
पावन नाम एक हे,
भक्त पावतो समाधान.
राम राम राम राम
नामस्मरणी जळती पापे,
घेता घेता राम राम.
राम नाम राम नाम.
शक्ती येते मुक्ति मिळते,
म्हणुनी घ्यावे राम नाम.

**– श्रीपाद अनंतराव दसरे**
छत्रपती संभाजी नगर
मो.९९७५९५०८०१

### वसंत...

गुलमोहराला तप्त झळा जरी
मखमली सरी बरसतो १
झुंबर देखणे पिवळा बहावा
म्हणती वहावा सर्वजण २
भासे अग्नीज्वाला पांगिरा पळस
सुगंधी कळस मोगर्याचा ३
गर्द आमराई मोहर फुलतो
मनस्वी झुलतो गार वारा ४

कोकीळ कूजन सप्तकात तार
सुरेल झंकार लहरते ५
सर्वांचा लाडका ऋतूगंध धुंद
अवनी बेधुंद होता स्पर्श ६
वसंत प्रेमाचा नित्य बहरावा
हृदयी उरावा मधु रूपे ७

**– सौ.माधुरी म.इनामदार**
मिरज

### उत्सव

वसंत आला क्षणभर रमला
असा जिभेवर विरून गेला
मधाळ वाटे मला गारवा
भल्या पहाटे कुठून आला !

निसर्ग पाहू चला नव्याने
नदी प्रवाही गुलाब राणी
नभात वारा पहाट न्यारी
वरूण गातो मधूर गाणी !

निनाद होतो जरा मलाही
प्रयाण आता करू निनावी
दिशा बदलती खट्याळ पाणी
मनात आशा धरू पहावी !

बरसत येतो अधीर श्रावण
कवेत घेण्या सचेत पल्लव
दवात वाहुन क्षणात न्हाऊन
शहारलेला कृतार्थ उत्सव !

**– प्रदीप बडदे, (नवी मुंबई)**
मो. ९५९४०२७९९५

### कविता...

डोंगरातून आलं
नदीचं पाणी
लोह मँगनिज
जणू तिचे लोणी

नदी जाते वाहत
कडेने गावाच्या
कितीतरी जंतू
आसऱ्याने पात्याच्या

गवतात किती पक्षी
किलबिल करती
गवताचे तुम्ही
आनंदाने डुलकी

वाऱ्याने गंध दूर
जणू मनाचा सूर
गंधाने पालटे
काठाचा नूर

**– प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**
गोवा पिन कोड ४०३००२

### कधी असे क्षण

कधी असे क्षण येतात
पायाखालची रेती सारुनी जातात
तर कधी मनाला
घट्ट चिकटून राहतात...

कधी असे क्षण येतात
भाव डोळ्यातून वाहतात
तर कधी ओल्या पापणीत कोरड
देऊनी सहनशक्तीही पाहतात..

कधी असे क्षण येतात
नुसतेच स्वप्नाचे बांध उभे राहतात
तर कधी कोसळणाऱ्या सरीत
दु:खही सामावून घेतात...

कधी असे क्षण येतात
खऱ्या खोट्याची जाणीव करुनी देतात
तर कधी पुरती वसुली
आपल्या कडूनच करुन घेतात...

कधी असे क्षण येतात
स्व: च्या जाणीवेत नेतात
तर कधी चढलेली काजळी लख्ख पुसून
नव्याने उजाळा मारून देतात.

**– रंजना सानप**
मायणी (सातारा)

### आम्हीसुद्धा शंकर आहोत

हलाहल पोचवणारे
तरीही आमच्याच धुंदीत
पेन किलर घेतोय सदा
अन् निरनिराळी औषधे
पचवत असतो कितीतरी
रसायने आणि काढे
कडू किराईत देखील
बिनदिक्कत रिचवत
फक्त शंकराने कुठे
पचवले होते हलाहल
आम्ही त्याचेच वंशज
ढवळतो सारा रसातळ
सगळा समाज बनलाय
विषाचेच कोठार,
आम्ही देखील तितकेच रागीट
असहनशील अन् शांत सुद्धा

**– प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**
९०११०८२२९९

### मानाचा मुजरा

शिवरायांचे चालणे : तेजाने भरले,
शिवरायांचे बोलणे :सत्याने भारले ।।

शिवरायांचे वागणे : न्यायाने झळाळले,
हिंदवी स्वराज्याचे :निशान फडफडले ।।

शिवरायांचे विचार :स्वराज्य प्रेरक बनले ,
शिवरायांचे आचार : शिस्तप्रिय ठरले ।।

राजांच्या तलवाराने :शौर्य गाजवीले,
शत्रूला नमविले : पाणीच पाजीले ।।

शिवरायांचे नेतृत्व : होता स्तंभदीप ,
शिवरायांचे शासन : यशस्वी प्रकाशदीप ।।

शिवरायांचे नियोजन: दूरदर्शी होते,
राजे होते कणखर : शत्रु थरथर कापे ।।

कणखर मुलायम: होते राजांचे मन,
जीव लावला प्रजेला:केले धर्म रक्षण ।।

राजांचा इतिहास : प्रेरणेची खाणं,
मावळ्यांनी तुडविले :डोंगर द-या रानं ।।

मोहीमा सह्याद्रीनं : खांद्यावर घेतल्या,
जंगल वाटा नसतांना :मोहिमा जिंकल्या ।।

रायगड, प्रतापगढ : कोंढाणा,पुरंदर.
सिंधुदुर्ग आणिक : सागरी आरमार ।।

राजे होते इंजिनिअर : टाके बांधले वर,
बारामाही पाणी : झाले आजरामर ।।

असा राजा होणे नाही : न्यायाने वागला,
जीव प्रजेला लावीला : तसाच झाडाला ।।

मुका जीव वाचविला : न्याय त्यांना दिला,
हा मानाचा मुजरा : या माझीया राजाला ।।

**प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**
छत्रपती संभाजीनगर
(९८२३११३५९४)

### महामानव

माणसांना माणसात आणले तुम्ही
माणुसकीचे खरे मोल जाणले तुम्ही
ज्यांनी केले दलितांवर तीव्र अत्याचार
त्यांना लेखनीने तडाखे हाणले तुम्ही
गुलामीत पिचत होते दलित हयातभर
लिहून संविधान दलितांना तारले तुम्ही
जात,पंथ,धर्म,भाषांची भिन्नता जेथे
अशा देशाला एकसूत्रतेत बांधले तुम्ही
देऊन प्रदीर्घ संविधान भेट भारतास
भारतभूचे आदर्श चित्र चितारले तुम्ही
करून ज्ञान प्राप्त अनेक विषयांचे
आदर्श विद्यार्थी रूप साकारले तुम्ही
बनता येते महान अथक संघर्षाने
बनूनमहामानवजगास दावले तुम्ही

**मनोज शोभाबाई प्रकाश अग्रवाल,**
**छत्रपती संभाजीनगर.**

### आयुष्याला कलाटणी

आयुष्याला कलाटणी,
हसत हसत जातो तो रंग,
प्रेमाच्या जादूने संजीवनी
देतो कुशीत जंग।
चांदण्यांचे उजाड जाळ,
तारकांचे सुरेल गाणे,
प्रेमाच्या त्या सुरांवर,
लपत आहेत जान।
सुखाच्या भराऱ्या घेत,
धुंद जिवाला सजवू,
जगण्याच्या उत्सवात,
साथीदार म्हणून राहू।
हृदयाच्या त्या शब्दांनी,
कवितेचा गंध जपतो,
प्रेम दिल्यास चालताना,
प्रत्येक पावलावर थरकतो।
झळाळत्या आकाशाच्या
काठावर, रंगांची लहर,
प्रेमाने पूर्ण करतो,
उगवतीचा चंद्र पर्व।
ऋतूंप्रमाणे बदलती,
आयुष्याची त्या गोड गोष्ट,
प्रेमाच्या अंगामध्ये रंग,
दर लहरी असंख्य कष्ट।

सौंदर्याचा तेज वाढत
जाई साथीने हिरवा
आसमानाच्या गालिच्याद्वारे,
प्रेमाने जिंकले भव्य।
परंपरेचे शिल्प, नवे
गाणं गात जाई,
आयुष्याच्या रंगभूमीवर,
प्रेमाची लवलव बाती।
सर्व रंगांच्या गूढात,
अक्षरांचे खेळाचं सजवणं,
प्रेम करून देत सतत,
आयुष्याला कलाटणीचं।
सोबत सांग चित्ताकर्षक,
ध्यानात हसत गात येऊ,
प्रेमाच्या त्या गुपितात,
मोजकंच वेल्हाळ चालू।

**– सौ. जयश्री अर्जुन मुंडे**
अंबाजोगाई

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559